ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. २०



अश्विनी जांभेकर – कुलकर्णी
(१९७५–१९८१)



दीपाली जांभेकर – सवाई
(१९७७–१९८३)

आमच्या शाळेवर प्रबोधिनीचा प्रभाव आहे. Out of the Box thinking ही प्रबोधिनीने आम्हाला दिलेली दिशा आहे. छोट्या–छोट्या गोष्टींमध्ये ती छाप दिसते. आमच्या शाळेमध्ये आमचं शाळेपुरते radio channel आहे. यासाठी अश्विनीने गाणं लिहिलं आहे आणि शाळेतल्या कला शिक्षकांनी त्याला चाल लावली आहे. प्रत्येक छोट्या–मोठ्या गोष्टीत पुढाकार घेऊन उत्साहाने काम करणे हे आम्ही प्रबोधिनीत शिकलो. कुठल्याही परिस्थितीला न भिता, त्यातून मार्ग काढणे हे आम्ही प्रबोधिनीतच शिकलो. एखादा विषय आपल्यासाठी नवीन असेल, तर बुजून न जाता त्याचा अभ्यास करणे या सवयीचा आम्हाला कायम फायदा झाला आहे. प्रबोधिनीने आम्हाला आत्मविश्वास दिला. ही शिदोरी घेऊन आम्ही वाटचाल करत आहोत. ती प्रेरणा घेऊन काम करत आहोत.

## गोष्ट 'हे आनंदी गाणे' पद्याची आणि मधल्या सुट्टीतल्या बासरीची

**अश्विनीताई:**



**विद्याताई व मुक्तीताईंबरोबर १९८१ बॅचमधील मैत्रिणी**

माझी प्रबोधिनीतील मुलींची पहिलीच तुकडी. त्यामुळे आमची प्रायोगिक तुकडी होती असं म्हणायला हरकत नाही. आमचा सत्तावीस जणींचा वर्ग होता. खूप नवनवीन गोष्टी आमच्या वर्गाने पहिल्यांदा केल्या. माझ्या कायम लक्षात राहील अशी एक महत्त्वाची आठवण म्हणजे, हे आनंदी गाणे! या पद्याच्या मूळ सहा गायिकांपैकी मी एक होते. तेव्हा दूरदर्शनवरच्या 'किलबिल' या लहान मुलांच्या कार्यक्रमातर्फे गाण्याची स्पर्धा होणार होती. त्यात आपल्या शाळेनी भाग घ्यायचं ठरवलं. प्रबोधिनीची शिकवणच अशी आहे की स्पर्धेत भाग घ्यायचा तो जिंकण्यासाठीच! स्पर्धेसाठी जेव्हा गाण्याबद्दल चर्चा सुरू झाली तेव्हा दुसऱ्यांचे कुणाचे कशाला, आपण आपलेच गाणे सादर केले पाहिजे असा विचार सुरू झाला आणि लताताईंनी गाणं लिहिलंसुद्धा, त्याला चालही प्रबोधीनीतच लावली.. स्पर्धेसाठी आम्ही अक्षरशः दिवसरात्र प्रॅक्टिस केली. आत्ताची प्रशालेची नवीन वास्तू, जी पूर्वी सहनिवासाची जुनी वास्तू होती, तिथे रात्री ९.३०-१० वाजेपर्यंत सराव करत राहायचो. गाण्यासाठी मग ड्रेस डिझायनिंग पण झाले, हिरवी सलवार, पिवळा कुडता आणि त्या कुडत्यावर तीन मोठी हिरवी फुलं!! आणि हाच ड्रेस पुढे सगळ्या शाळेचा युनिफॉर्म झाला! आम्ही स्पर्धेसाठी जेव्हा गेलो, तेव्हा इतर स्पर्धकांचा विश्वासच बसेना, की हा आमचा युनिफॉर्म आहे!! अजून एक खूप चांगली आठवण अशी, की त्यावेळेस आमची २७ जणींची एकच बॅच असल्याने रोजचा सत्तावीस जणींचा डबा एका मुलीच्या घरून यायचा. आमच्या आयांनी तेव्हा ठरवून, रोज वेगवेगळ्या मुलीच्या आईने २७ जणींचे डबे दिले आहेत. एकंदरीत काय अगदी घरासारखं खेळीमेळीचं वातावरण होतं प्रबोधिनीत.

**दीपालीताई :**



**१९८३ बॅचमधील मैत्रिणी**

मी पाचवीत गेले होते नुकतीच, अश्विनी प्रबोधिनीमधल्या सगळ्या गमती-जमती घरी येऊन सांगत असे, त्या सगळ्या गमती ऐकल्यावर मी आईला म्हणले ''मला पण प्रबोधिनीतच जायचेय, मी काही या (माझ्या आधीच्या) शाळेत शिकणार नाही''. हे सगळं वर्ष सुरू होऊन एक महिना झाल्यावर घडलं. कारण मी म्हणले मला उद्यापासून शाळेतच जायचे नाही. आमच्या घरी तर सगळ्यांना जाम टेन्शन आले. कारण IQ टेस्ट मध्ये पास होणे महत्त्वाचे होते. पण मला जेव्हा प्रवेश मिळाला तेव्हा सगळ्यांना हायसं झालं. पहिल्याच आठवड्यात आप्पांनी मला बोलावलं आणि विचारलं आपण एवढ्या मोठ्या शाळेतून इथे आलात, ही आपली शाळा तर खूप छोटी आहे ! मला प्रबोधिनीत का यावेसे वाटले हे त्यांनी माझ्याकडून अत्यंत खुबिनी काढून घेतलं. त्यांच्या बोलण्यातली आपुलकी, तो हसरा चेहरा अजूनही माझ्या डोळ्यासमोर येतो. शाळेच्या संचालकांशी मी बोलते आहे याचे जरासेसुद्धा दडपण त्यांनी मला येऊ दिले नाही. तेव्हापासून आप्पा माझे एकदम आवडते झाले. **आप्पा समोर आले की , आप्पा नमस्ते आणि त्यांचे प्रत्येकाला हात जोडून, हसून, मान किंचितशी पुढे झुकवून, तेवढ्याच प्रेमाने नमस्ते म्हणणे, किती मस्त वाटायचे !! आजही कधी प्रशालेत गेले, की वाटते एकदम कुठूनतरी समोर येतील आणि मी म्हणीन आप्पा नमस्ते ! माझ्यासाठी आप्पांची सर्वात हृद्य आठवण म्हणजे त्यांनी शिकवलेली बासरी!!! मला वाटतं सहावी-सातवीत असतानाची गोष्ट आहे ही, प्रत्येक वर्गात संचालकांचा तास असे. एकदा आप्पांनी त्या तासामध्ये बासरी वाजवली होती. ती ऐकून तास संपल्यावर मी, गीता लिमये, शुभांगी जोशी, स्मिता भंडारी एकत्र आप्पांकडे गेलो आणि चक्क म्हणालो, आप्पा आम्हाला बासरी शिकवाल का? आप्पा लगेच म्हणाले, ''हो शिकवीन की , पण कधी शिकणार''? आम्ही म्हणालो आम्ही मधल्या सुट्टीत पटकन डबा खाऊ आणि येऊ. मग काय तेव्हापासून आम्ही दर बुधवारी मधल्या सुट्टीत भराभर डबे खाऊन बासरी शिकायला जाऊ लागलो. अजूनही माझ्याकडे ती बासरी आहे, माझ्यासाठी ती आप्पांची खूप मोठ्ठी ठेव आहे.**

आता आम्ही शाळेच्या संचालिका आहोत, जेव्हा काही वेगळे निर्णय घ्यायची वेळ येते तेव्हा आम्हाला आप्पांची प्रकर्षाने आठवण येते. एक खूप छोटीशीच गोष्ट आहे पण फार महत्त्वाची वाटते, ती म्हणजे आप्पांची आणि आपल्या शाळेतील सगळ्यांचीच वागण्याची आणि बोलण्याची पद्धत. किती शिकण्यासारखे आहे यातून. म्हणजे समजा एखाद्याला न दुखावता, अजून चांगले काम करण्याचे प्रोत्साहन द्यायचे असेल, तर छान काम केलत, पण आपण अजूनही चांगले काम करू शकतो, असं म्हणणं किंवा एखाद्याच्या चुकीबद्दल बोलताना आपण ही त्या चुकीची तेवढीच जबाबदारी घेत, आपलं जरा चुकलच, आपण हे वेगळ्या पद्धतीने करायला हवं होतं असं म्हणणं. एखाद्या नेत्याने कसे वागावे याची किती चांगली शिकवण आहे ही. आज जर आप्पा असते, तर त्यांना आपल्या विद्यार्थिनींची शाळा पाहून किती अभिमान वाटला असता !



सिटी प्राईड शाळा, मोशी

**ध्येयनिश्चिती...**

**अश्विनीताई:**

इंजिनीअरींगचं शिक्षण झाल्यावर बराच काळ मी नोकरी केली. दीपाने माझ्यापेक्षा कमी काळ नोकरी केली, आणि माझ्याआधी १-२ वर्षं तिने संस्थेत काम सुरू केले. त्यानंतर मात्र, जेव्हा तुम्हाला एखादी संस्था पुढे न्यायची असते, त्यासाठी जे आवश्यक आहे, ते तुम्ही करता. या सगळ्या प्रवासात जस-जसं आम्हाला नवीन गोष्टी कळत गेल्या, पूरक वाटत गेल्या, त्या आम्ही केल्या. माझं मॅनेजमेन्ट मध्ये मास्टर्स झालं होतं. जेव्हा Ph.D. करायचं ठरवलं, तेव्हा आमची शाळा आम्ही सुरू केली होती, म्हणून मग मी Education Management मध्ये Ph.D. करण्याचा निर्णय घेतला. हे सर्व पहिल्यापासून आखीव-रेखीव ठरवून झालं नाही. जशी-जशी एखाद्या गोष्टीची आवश्यकता वाटत गेली तसे-तसे करत गेलो. काही अडचणीही आल्या, रस्त्यात खाचखळगे आले. पण त्यातून मार्ग काढून आम्ही पुढे आलो.

**दीपालीताई :**

काही वर्षं नोकरी करून मी वडिलांच्या संस्थेत काम सुरू केले. सुरुवातीला software प्रोजेक्ट्स केली. एकीकडे डिप्लोमा, certificate level चे व्होकेशनल बोर्डाचे कोर्सेस सुरू केले. पुढे अश्विनीही जॉईन झाली. २००२ मध्ये आम्ही IICMR Management Institute सुरू केली तेव्हा आम्हाला दोघींना प्रकर्षाने जाणवले, की शैक्षणिक क्षेत्रात पुढे काही करायचे असेल तर नुसतेच BE असून चालणार नाही. म्हणून मग मी आधी कॉम्पुटर मॅनेजमेंटमध्ये मास्टर्स केले आणि RFID Technology मध्ये पुणे विद्यापीठातून Ph.D केले.


सिटी प्राईड शाळा, निगडी

Higher education मध्ये काम करताना, विद्यार्थ्यांशी बोलताना, एका चांगल्या शाळेत शिक्षण घेणे किती महत्त्वाचे असते हे खूप प्रकर्षाने जाणवले. निगडीला माझ्या वडिलांनी १९७० साली जागा घेऊन ठेवली होती तिथे स्वतःची शाळा सुरू करायची हे आम्ही पक्कं केलं. यामागची सर्वात मोठी प्रेरणा म्हणजे ज्ञान प्रबोधिनी! जर प्रबोधिनीत आमचं शिक्षण झालं नसतं, तर कदाचित आमच्या मनाला हा विचारही कधी शिवला नसता. आम्ही दोघींनीही B.Ed चे शिक्षण घेतले नाही पण प्रबोधिनीमध्ये आम्हाला जी अनुभवाची शिदोरी मिळाली तीच आमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. आम्ही शाळा सुरू केली तेव्हा अर्थात, लोकांच्या मनात खूप प्रश्न होते, आम्हाला शाळा चालवायचा काहीच अनुभव नाही, लोक कसे विश्वास ठेवणार? यासाठी आमचे पहिले विद्यार्थी म्हणून आम्ही आमच्या स्वतःच्या मुलांना शाळेत घातलं. हे सर्व करताना आम्हा दोघी बहिणींमध्ये फारसे मतभेद कधी झालेच नाहीत. आम्हा दोघींचे विचार आपसूक जुळतात, एकमेकींच्या कल्पनांना पूरक ठरतात. आम्ही बहिणी आहोत तितक्याच एकमेकींच्या मैत्रिणीही आहोत, अगदी प्रबोधिनीत शिकत असताना, ते आत्ता

स्वतःची शिक्षण संस्था चालवताना आम्ही दोघी अगदी सहजगत्या एकत्र निर्णय घेऊ शकतो. एकाच वातावरणात आमच्यावर शिक्षणाचे संस्कार झाले आहेत हेच यामागचे कारण असावे.

## निरलस श्रमूनी सुयश मेळवू...

**अश्विनीताई:**




वीस वर्षांपूर्वी जेव्हा शाळेची सुरुवात केली, तेव्हा एका छत्री खाली सगळं मांडून, गवतात बसून आम्ही कामाला सुरुवात केली. तेव्हा आमच्या भागात एवढी development देखील नव्हती झाली, तरीही आम्ही जिद्दीने काम सुरू ठेवलं. हळूहळू लोकांचा आमच्यावर विश्वास बसायला लागला. नावीन्य, वेगळेपणा, सातत्य, सचोटीने आणि झोकून देऊन काम करण्याची वृत्ती हे सगळं जे आम्ही प्रबोधिनीत शिकलो, ते आचरणात आणलं. हे पाहून लोकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. पिंपरी-चिंचवड हा तसा industrial area. विविध भागांमधून आलेली, विविध विचारधारेतून आलेली मुलं आमच्या शाळेत यायला लागली. हा एक वेगळा आणि समृद्ध अनुभव होता. प्रबोधिनीत शिकत असताना, सर्वजण एकाअर्थी समान विचारसरणीतून आलेले होते, त्यामुळे एका homogeneous वातावरणात आमचं शिक्षण झालं होत. आमची शाळा Lower KG पासूनची आहे. या वयाच्या मुलांचं शिक्षण, Evaluation कसं कराव हे अनुभवातून आम्ही शिकत गेलो, कारण आमच्यासाठी या सर्व बाबी अगदीच नवीन होत्या. आमच्या पहिल्या तुकडीच्या पालकांच्या मनात ती धाकधूक होती. एक प्रसंग आठवतो, अगदी सुरुवातीला एकदा, दोन वाजता शाळा सुटली आणि पाच वाजले तरी काही मुलं घरी पोचली नाव्हती, पालक फोन करून विचारत होते... असे धक्के खाऊन, शिकून आम्ही पुढे आलो.

**दीपालीताई:**



राजीव गांधी आय. टी. एक्सलन्स पारितोषिक

एखादी जबाबदारी घेतली की त्याच्या खोलात जाऊन, स्वतः सर्व माहिती घेऊन काम केले पाहिजे हे आम्ही प्रबोधिनीत शिकलो. त्यामुळे शाळेला प्राचार्या जरी असल्या तरी आमची पण तेवढीच involvement असते. उंटावरून शेळ्या हाकणं आम्ही कधीच केले नाही. सुरुवातीला अगदी छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये लक्ष घालून, माहिती घेऊन कामं केली. इंग्रजीची शुद्धलेखनाची चार रेघांची वही असेल, तर तिथे अक्षरं कशी लिहावीत, इथपासून आम्ही सुरुवात केली होती.

शाळा सुरू करण्यापूर्वी जेव्हा आम्ही आमच्या स्वतःच्या मुलांसाठी शाळा बघत होतो, तेव्हा आमच्याही नकळत कुठेतरी प्रबोधिनीशी तुलना केली जात होती. या शाळेत असं काय वेगळं/छान आहे ज्यामुळे आम्ही आमच्या मुलांना इथे घालावं? या प्रश्नाचं उत्तर आम्हाला काही केल्या मिळत नव्हतं. आमच्या शाळेबद्दल कोणी असा प्रश्न आज आम्हाला विचारला, तर ते उत्तर आम्हाला देता येईल, यासाठी आम्ही झटलो. शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाला त्याच्या/तिच्या आवडीची किमान एक गोष्ट - मग ते अभ्यासाचे विषय असोत, गाणं किंवा इतर छंद असोत किंवा स्किल डेव्हलपमेंट असो - इथे त्यांना ते शिकता आल पाहिजे आणि त्याची गोडीही लागली पाहिजे, याच्याकडे आम्ही मनापासून लक्ष दिले. आमच्या या प्रयत्नांची, कष्टाची प्रचिती आम्हाला दुसऱ्याच वर्षी आली. प्रवेशाच्या वेळेस जेव्हा आम्ही शाळेत गेलो तेव्हा प्रवेशाचे फॉर्म घेण्यासाठी एक भली मोठी रांग शाळेच्या दरवाज्यामधून बाहेर लांबपर्यंत आली होती.,. आमच्या दोघींच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

शाळेत प्रवेश निवडीसाठी मग आम्ही एक वेगळी पद्धत सुरू केली. शाळेमध्ये येणाऱ्या KG च्या मुलांसाठी कुठलीही परीक्षा न ठेवता, आम्ही त्यांच्या पालकांना एक Subjective Questionnaire द्यायला सुरुवात केली, जी त्यांनी कुठल्याही भाषेत भरावी. यामुळे मुलांच्या कुटुंबाबद्दल, त्यांच्या विचारसरणीबद्दल आम्हाला कळत गेलं.

शाळा सुरू केल्यावर शाळेची प्रार्थना काय असावी, याचा विचार करताना आम्हा दोघींच्या मनात फक्त एकच उत्तर होतं – रवींद्रनाथ टागोर यांची Where The Mind is Without Fear... ही कविता, आम्ही प्रबोधीनीत शिकलो होतो, चालीसकट.

शाळेत आम्ही मुलांसाठी विविध उपक्रम सुरू केले, शालेय शिक्षणेतर उपक्रमांसाठी प्रोत्साहन दिले. हळूहळू तुकड्या वाढवल्या. दिवसें-दिवस शाळेत प्रवेश मिळणे अवघड होऊ लागले, पण तरी लगेच दुसरी शाळा काढायची आम्ही घाई केली नाही. आधी पहिल्या शाळेचा नीट जम बसवला, quality accreditation घेतले आणि मगच पंधरा वर्षांनी, २०१७ मध्ये दुसरी शाळा मोशी मध्ये सुरू केली.

**या सगळ्या प्रवासामध्ये आम्हाला उत्तम साथ लाभली ती आमच्या स्टाफची!! आमच्या यशामध्ये आमच्या स्टाफचा मोठा वाटा आहे. आजही अगदी सुरुवातीला आमच्या बरोबर असलेले शिक्षक आजही आमच्या बरोबर आहेत. आमच्या शिक्षकांनी तसेच शिक्षकेतर स्टाफ ने आमच्या शाळेसाठी जीव ओतून काम केलं आहे. सांगायला अभिमान वाटतो, आमच्या संस्थेत काम करणाऱ्यांपैकी बऱ्याच जणी या Single Mothers आहेत, आपल्या कुटुंबाच्या Sole- Bread Winner आहेत. आम्हाला समाधान वाटतं, की आम्ही त्यांच्या आयुष्याचा, वाटचालीचा एक भाग आहोत. City Pride School हे एक मोठं कुटुंब आहे. आमची दुसरी शाखा सुरू करताना आम्ही आमच्या शिक्षकांना तिथे promote केलं, प्रोत्साहन दिलं. त्यामुळे, त्यांना नवीन संधी मिळाली, आणि आम्हाला त्यांच्याबाबत विश्वास आहे, की त्या नवीन शाळा देखील पहिल्या शाळेइतक्याच समरसतेने चालवतील. आज शाळेचा पसारा वाढला आहे, तरी आम्ही दोघी सर्व शिक्षकांशी बोलतो. वर्षातून किमान एकदा का होईना, प्रत्येक शिक्षकाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा, त्यांचे विचार/अनुभव ऐकण्याचा नेम आम्ही कटाक्षाने पाळतो.**

आम्हाला जाणवणारी एक गोष्ट म्हणजे आमच्या शाळेमध्ये आणि तिथल्या शिक्षण पद्धतीवर प्रबोधिनीची छाप आहे. उत्तमतेचा ध्यास, मुलांचा सर्वांगीण विकास यासाठीच्या आमच्या विचारांमध्ये प्रबोधिनी डोकावते. आमच्या गुरुजनांनी शिकवलेल्या गोष्टी आम्ही पुढे नेत आहोत, याचं आम्हाला समाधान वाटतं.



**पी.सी.एम्.सी. चे कमिशनर श्री. श्रावण हर्डिकर यांना थ्री डी प्रिंटर डिझायनिंगच्या प्रकल्पाविषयी माहिती देताना विद्यार्थी**



**शाळेमधील विज्ञान प्रदर्शन**



**अटल टिंकरिंग लॅब**



**सिटी प्राईड शाळेतील रेडिओ सादरीकरण केलेला संघ**



**मराठी बाल नाट्य परिषदेमधील विजेता संघ**

**City Pride School Where The Mind is Without Fear...**

**अश्विनीताई:**



आमच्या शाळेमध्ये येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेची गोडी लागली पाहिजे, असा आमचा ध्यास आहे. एक मोठा वयोगट - Lower KG ते बारावी हा आमच्या शाळेत येतो. प्रत्येक मूल हे शाळेत गणित आणि विज्ञान शिकायलाच येईल असं नाही. कोणी शालेय विषय शिकायला, कोणी खेळायला, कोणी गायला, कोणी इतर उपक्रम करायला येईल. सर्वांना आमची शाळा हवीहवीशी वाटली पाहिजे, त्यांच्यासाठीच्या सर्व गरजा आम्हाला पुरवता आल्या पाहिजेत, असं आम्हाला वाटतं. आमच्या शाळेत आम्ही Skill Labs सुरू केल्या आहेत, ज्या सहावी नंतरच्या विद्यार्थ्यांना Animation, Robotics, fashoin designing, Advance Mechanics अशा अनेक विषयांशी ओळख करून देतात. मुलांना या नवीन विषयांची नुसती ओळखच नाही, तर उत्सुकता निर्माण व्हावी, त्याची भीती असू नये यासाठी Skill Labs उपयोगी आहेत. तिथून विद्यार्थ्यांचा कल, अभ्यास करायची वृत्ती, इतर सुप्त गुण पुढे येतात. शाळेचं वेळापत्रक ठरवताना शालेय विषयांसोबत इतर विषयांनाही प्राधान्य मिळायला हवं, आणि विद्यार्थ्यांना त्याचं ओझं वाटू नये याची आम्ही काळजी घेतो. गाणं/खेळ/तबला यासारखे विषय जर शनिवारी सुट्टीच्या दिवशी घेतले, तर ते optional वाटू शकतात, या विषयांमध्ये देखील शालेय अभ्यासाइतकंच सातत्य महत्त्वाचं आहे. म्हणून एक संतुलित वेळापत्रक आखणं आणि ते पाळणं हे आमच्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. या सर्व process मध्ये पालकांचा सहभाग देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. पालकांना सहभागी होण्यासाठी आम्ही नेहमीच प्रोत्साहन देतो. वेगवेगळी vocational lectures, आंतरशालेय स्पर्धा यांत पालकांना सहभागी करून घेतो. विद्यार्थी-पालक-शिक्षक ही कडी दृढ व्हावी, अशी आमची इच्छा आहे. आठवी मधल्या मुलांसाठी आम्ही Social Skill Enhancement उपक्रम घेतो, ज्यात ते दुसऱ्या एका विद्यार्थ्याच्या घरी जाऊन तिथल्या लोकांशी संवाद साधतात. शक्यतो यासाठी Joint Family / आजी-आजोबा असलेल्या घरी मुलांना पाठवतो, त्यांना तिथल्या लोकांशी कनेक्ट व्हायला सांगतो. संवाद साधणे, वेगवेगळ्या वयोगटाच्या लोकांशी वेगवेगळ्या विषयांवर बोलणे याचा मुलांना फायदा होतो.

**दीपालीताई:**



आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार वेगवेगळ्या opportunity मिळाल्यामुळे आज विद्यार्थी शाळेत असताना ठरवू शकतात की मला पुढे जाऊन काय व्हायचे आहे, काहींना Animator व्हायचंय, काहींना डॉक्टर व्हायचंय, Fashion Designer, Engineer व्हायचंय. परंतु, या profession मध्ये काम करताना नक्की काय करावे लागते त्यासाठी पुस्तकी अभ्यासाव्यतिरिक्त कुठल्याही profession ची reality काय आहे याची व्यवस्थित माहिती विद्यार्थ्यांना असणे जरूरी आहे. यासाठी आम्ही आमच्या नववीतल्या मुला-मुलींसाठी समर इंटर्नशिप प्रोग्राम सुरू केला आहे. आमच्या पालकांचा यात खूप मोठा सहभाग आहे. आमच्या Connect to Inspire उपक्रमात पालक सहभागी होतात, त्यांच्या व्यवसायाची माहिती देतात आणि कुठल्या पद्धतीने ते शाळेशी जोडले जाऊ शकतील हे सांगतात. आम्ही मग त्या विषयातील interested विद्यार्थ्यांना त्यांच्याबरोबर जाऊन त्यांचं काम ८ ते १० दिवस बघण्याची संधी देतो. या उपक्रमाची खासियत अशी, की मुलांना हे नक्की कळते की आपल्याला या field मध्ये जन्मभर काम करायला आवडेल की नाही. कुठल्याही विद्यार्थ्याला आपल्याला काय आवडतं आणि काय नाही या दोन्ही गोष्टींचा डोळसपणे विचार करता आला पाहिजे हे केवळ करिअर साठीच नाही, तर इतर बाबतीत सुद्धा खूप उपयुक्त ठरते. मागच्याच वर्षी, काही विद्यार्थिनींना, ज्यांना डॉक्टर व्हायचं होतं, त्यांना आमच्या इंटर्नशिप प्रोग्रॅम मधून एका पालकांच्या हॉस्पिटल मध्ये एक छोटं ऑपरेशन बघण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यातल्या एका विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले, की मला डॉक्टर व्हायचे होते पण आता मला माझ्या निर्णयावर परत विचार

करावासा वाटतोय ..काहींनी सांगितलं की हा ८–१० दिवसांचा अनुभव त्यांना खूप काही शिकवून गेला. Competative Exams साठी coaching, विविध स्पर्धांची तयारी, शाळेच्या विविध कार्यक्रमांमध्ये पालकांचा Active सहभाग ह्या सगळ्या ना आम्ही शाळेमध्ये खूप महत्व देतो.

गेल्या वीस वर्षांच्या या प्रवासात आम्ही खूप गोष्टी नव्याने शिकलो. आमची शाळा ही Gifted मुला–मुलींसाठी नाहीये. ती cosmopolitan भागात आहे. विविध सामाजिक स्तरातून, विविध कौटुंबिक पार्श्वभूमीची, विविध भाषा बोलणारी अनेक मुलं मुली आमच्याकडे शिकायला येतात. प्रबोधिनीमध्ये आम्ही एकच तुकडी असलेल्या, homogeneous background असलेल्या शाळेत शिकलो. विविध प्रकारच्या आणि संख्येने जास्त असलेल्या गटाला शिकवणे, ही एक वेगळी गोष्ट होती आमच्यासाठी. आम्ही सुरुवातीपासूनच सर्व विद्यार्थ्यांमधून उत्तम ते पुढे आणण्याचा प्रयत्न करत आहोत. यापुढे देखील आम्ही असेच प्रयत्न करत राहू आणि नवनवीन उपक्रम सुरू करू.

रविन्द्रनाथ टागोर यांची There are numerous strings in your lute ही कविता आम्हाला सुप्रियाताईंनी शिकवली होती. आज आमच्याकडे शिकून विद्यार्थी जेव्हा बाहेर पडतात, आणि यशाची शिखरे गाठतात तेव्हा ही कविता आम्हाला आठवते. Amidst your numberless stars let me place my own little lamp...



**मोशी येथील सिटी प्राईड शाळा**



**रावेत येथील सिटी प्राईड शाळा**

**शिक्षिका आणि संचालिका**

**अश्विनीताई:**

गेल्या काही वर्षात, विशेषतः Internet चा वापर वाढल्यानंतर, आम्हाला मुलांच्या attitude मध्ये फरक जाणवतोय. आम्ही लहान असताना, शिकत असताना, we had limited sources of information. We trusted them. आत्ता मुलांकडे भरपूर information sources आहेत, कित्येकदा कोणाचे तरी विचारच information म्हणून वापरले जातात, जे कुठेतरी धोकादायक वाटतं. आजचे विद्यार्थी confident आहेत, resourceful आहेत, पण /ा माहितीच्या खजिन्याचं करायचं काय हे त्यांना नीटसं लक्षात येत नाहीये, असं मला वाटतं. त्यांच्याकडे इतकी माहिती आहे, की त्यांना वाटत राहतं की त्यांना सगळं माहितीये, पण खरं तर एवढी माहिती process करायला देखील वेळ नाहीये त्यांच्याकडे.



**निगडी येथील शाळेतील शिक्षिका**

**दीपालीताई:**

शेवटी कॉम्पुटर हे काय एक टूल आहे जे तुम्हाला तुमचे काम सोप्या पद्धतीने करायला मदत करतं. त्यामुळे हा विषय शाळेत शिकवताना सुद्धा तो बरोबर पद्धतीने शिकवला गेला पाहिजे. आमच्या शाळेमधील कॉम्पुटर विषयासाठी आम्ही स्वतः अभ्यासक्रम तयार केला आहे. मला आजूबाजूला बघितल्यावर असं लक्षात आलं, की बऱ्याच शाळांत अगदी प्राथमिक शाळेपासून मुलांना Word, Excel शिकवतायत, जेव्हा त्याचा त्यांना उपयोग कमी आणि कंटाळा जास्ती येणार आहे. शेवटी Word हा एक editor आहे. तो पहिलीत Typewriter सारखा वापरण्यापेक्षा, जेव्हा पुढे सहावी-सातवीत कुठला रिपोर्ट लिहायचा असेल, Assignment करायची असेल तेव्हा तो effectively वापरता यायला हवा. म्हणून, आमच्या शाळेच्या अभ्यासक्रमासाठी मी आणि आमच्या शिक्षकांनी पुस्तकं लिहिली. हळूहळू दहावी पर्यंत Python Programming चा अभ्यास आम्ही यात शिकवतो. थोडी थिअरी, बराचसा practical चा समावेश यात केला आहे. आजकालच्या मुलांना जरी कॉम्पुटर ओळखीचा असला, तरी त्याचा योग्य उपयोग कसा करता येईल याचा विचार करून आम्ही पुस्तकं लिहिली. आमच्या तीनही शाळांमधे आम्ही हा अभ्यासक्रम राबवतो आणि काळानुसार योग्य ते बदल करत असतो.



**रोबोटिक्स मधील विजेता संघ**

आम्ही शाळेत personalised learning साठीसुद्धा सॉफ्टवेअरचा वापर करतो. यामुळे शाळेच्या दोन कॉम्पुटर labs वर ताण यायला लागला मग आम्ही साधारण ४४ लॅपटॉप असलेल्या दोन फिरत्या ट्रॉल्या तयार केल्या ज्यात charging stations, wifi access points लावले आहेत. या ट्रॉलीज तासाच्या वेळेस वर्गात नेल्या जातात त्यामुळे मुलांचा जाण्या- येण्याचा वेळही वाचतो. एकंदरीत काय प्रत्येक अडचणीवर वेगळा विचार करून मात करता येते.



**ॲडव्हान्स गणिताचे इ. ३ री चे विद्यार्थी**

एखादी शाळा चांगली किंवा वाईट हे त्यात शिकवणाऱ्या शिक्षकांच्या वरून ठरते. आमच्या इतक्या वर्षांच्या अनुभवातून आम्हाला एक बाब अशी लक्षात आली आहे, की चांगले शिक्षक मिळणं अतिशय अवघड गोष्ट आहे. आम्ही स्वतःला भाग्यशाली समजतो, की आम्हाला उत्तम शिक्षक लाभले. आज जेव्हा आम्ही शिक्षकांसाठी जाहिरात देतो, तेव्हा अक्षरशः १६००-१७०० अर्ज येतात. पण ४-५ फेऱ्यांनंतर अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेच चांगले शिक्षक मिळतात, ह्याचा आम्हाला खरोखर खेद आहे. हे सगळे B.Ed. झालेले, अनुभवी/अननुभवी शिक्षक असून देखील ही परिस्थिती का असावी? आमच्याकडे interview घेताना आम्ही दोघी मिळून पहिली suitability round घेतो, त्यातच निम्मे अधिक बाद होतात. दुसरं निरीक्षण असं, की बऱ्याच अशा शिक्षकांची स्वतःबद्दलची एक unrealistic image असते - आम्ही दहावीच्या मुलांना शिकवलंय, इतके वर्षं शिकवलंय, पण त्यांच्यात आम्हाला दिसते ती lack of creativity, lack of skill to make class interesting. बऱ्याचदा आम्ही या शिक्षकांचे graduation marks बघण्याऐवजी दहावी-बारावीचे मार्क बघतो. For us, that is more reliable. ज्या वर्गांना तुम्ही शिकवणार आहात, जो अभ्यासक्रम तुम्ही शिकवणार आहात, तो किंवा तसा अभ्यासक्रम तुम्ही शिकत असताना कसे शिकलात? हे त्यातून कळतं. तुम्ही Mathematics चे शिक्षक आहात, पण दहावीमध्ये तुम्हाला गणितात ५० टक्केच मार्क मिळाले असतील, तर कसं होणार? कधी-कधी तर आम्हाला असं वाटतं की यांनी B.Ed. हा last option ठेवलेला असतो की काय? You wishing to do B.Ed. because you enjoy teaching and you doing B.Ed. because it is a requirement to be a teacher या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. चांगले शिक्षक तयार व्हावेत यासाठी B.Ed. च्या माध्यमातून किंवा इतर कुठल्या माध्यमातून systematic प्रयत्न होत आहेत का? आमच्या अनुभवानुसार आम्हाला भेटलेल्या चांगल्या शिक्षकांमध्ये accidental शिक्षकच जास्त आहेत. त्यांना शिकवायची आवड आहे, नवीन शिकायची देखील आवड आहे.

चांगले शिक्षक जर तयार करायचे असतील, तर on-the-job training महत्त्वाचं आहे. अर्थात, इतर jobs प्रमाणे इथेदेखील hand-holding लागतेच. इतक्या वर्षांच्या शाळा चालवायच्या अनुभवांमधून आमचे HR Skills तेवढे develop झालेले आहेत, की spark असलेले अननुभवी/अनुभवी शिक्षक आम्ही लगेच ओळखू शकतो. पण गेल्या काही वर्षांत ते देखील कमी दिसत आहेत. यासाठी शिक्षकांच्या training मध्ये बदल आवश्यक आहे. Technology ची ओळख असणे आवश्यक आहे. त्याचे integration त्यांच्या विषयात करायला त्यांना जमायला हवे मुख्य म्हणजे त्यांच्याकडे adaptability हवी. मुलांना एंगेज कसं करावं, याचंदेखील शिक्षण आधीपासून मिळायला हवं, असं आम्हाला वाटतं.



**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन मधील एम्. सी. ए. विद्यार्थ्यांचा विजेता संघ**

सध्या आमच्या औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था या ट्रस्टखाली आम्ही निगडी मध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी Institute of Industrial and Computer Management and Research (आय.आय.सी.एम.आर.) या सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाशी संलग्न अशा संस्थेत, AICTE approved MBA, MCA प्रोग्रॅम्स तसेच Post Graduate Research Center चालवतो.




**पुणे विद्यापीठातर्फे आयोजित आविष्कार या स्पर्धेमधील बी. एस्. सी. (कॉम्प्युटर) विद्यार्थ्यांचा विजेता संघ**

आम्ही दोघीही प्रोफेसर आणि Management आणि Computer विषयात पी.एच्.डी. रिसर्च गाईड आहोत. चिंचवड ला ATSS College of Business Studies and Computer Application या कॉलेजात सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाशी संलग्न असे BBA, BBA (CA), BSc (Comp.), MSc (Comp.) हे कोर्सेस चालवले जातात. आशा तऱ्हेने के.जी. ते पी.एच्. डी. पर्यन्तचे शिक्षण आम्ही सध्या पिंपरी-चिंचवडमध्ये देत आहोत.

आमच्या सगळ्या संस्थांमधल्या एकूण स्टाफ पैकी ९५% महिला आहेत. आमच्या संस्थांमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांपैकी बहुतेकांची मुलं आमच्या शाळेत शिकतात. Women helping Women ही आमच्यासाठी खूप महत्त्वाची संकल्पना आहे, आम्ही त्यासाठी आमच्या पद्धतीने हातभार लावत आहोत.



**एम्.सी.ए. विद्यार्थ्यांचे मायक्रोसॉफ्ट सर्टिफिकेशन पूर्ण झाल्यानंतर अध्यापक व सदस्यांबरोबर आय.आय.सी.एम.आर. चे विद्यार्थी**



**आय.आय.सी.एम.आर. इन्स्टिट्यूटची वास्तू**



**ए.टी.एस्. कॉलेजची वास्तू**

## शाळा आणि कोरोना

**अश्विनीताई:**

Technology चा वापर कोरोनाच्या आधीपासून आमच्या शाळेत चालू आहे. Lockdown मुळे सगळे बंद झाले होते, स्टाफ नव्हता पण दीपाने खूप काम केलं यावर जसं कुठलं software वापरावं, काय पद्धतीने ते वापरावे, कसे बदल करावेत, काय पॉलिसी सेट करायच्या, विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे Ids तिने lockdown मध्ये केले. आमच्या सगळ्या शिक्षकांना तिने शिकवले. आमच्या शिक्षकांमध्ये मराठी भाषिक, हिंदी भाषिक शिक्षक आहेत, तसेच काही वयाने मोठे असलेले शिक्षक आहेत. या नवीन पद्धतीला adjust व्हायला सर्वांनाच काही काळ लागला. पण मला कौतुक करावंसं वाटतं, की आमच्या सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी हा बदल स्वीकारला आणि लवकर आत्मसात केला. आम्ही गेल्या शैक्षणिक वर्षात सर्वांचा portion पूर्ण करू शकलो. Evaluation थोडं hamper झालं, पण शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी आम्ही घेतली. गेल्या वर्षी जितके उपक्रम online घेता आले, ते घेतले.

या सगळ्यामध्ये आमच्या शाळेच्या Councelling सुविधेचा एक सकारात्मक अनुभव आहे. आम्ही हे बघितले आहे की विद्यार्थी साधारणतः counsellor कडे प्रत्यक्ष जाणे टाळतात. पण आता Online पद्धतीमध्ये एक फायदा असा झाला की त्यांना privacy मिळाली, ते counsellors शी बोलायला लागले. एक अनपेक्षित, पण चांगली आणि गरजेची गोष्ट यानिमित्ताने समोर आली.

**दीपालीताई:**

यात ज्या विद्यार्थ्यांकडे online शिक्षणासाठी लागणारे सगळे resources नव्हते त्यांना थोडे अवघड गेले. काहींचे आईवडील पण नोकरी करणारे आहेत त्यांना त्यांच्या ऑफिसच्या वेळेत त्यांचे resourses share करणे अवघड जात होते, शाळेच्या वेळात लहान मुलाबरोबर राहणे देखील अवघड होत होते. अशांसाठी मग आम्ही आमचे youtube chanel केले. आणि पंधरा मिनिटांचे Youtube Videos Upload केले, जेणेकरून त्यांना हवं तेव्हा ते बघता येतील. साधारणतः ४५ मिनिटांच्या तासामध्ये शिक्षक दर वेळेस नवीन शिकवतोच असे नाही. पंधरा मिनिटं नवीन concept, उरलेला वेळ practise अशी ढोबळ मांडणी असते. आम्ही हे videos केवळ concept आणि explaination यांना target करून बनवले. सुरुवातीचे एक-दोन महिने जास्त काम करावं लागलं, त्या सगळ्यांना खूप सपोर्ट द्यावा लागला पण आता वर्षभरानंतर घडी बसली आहे. Online पद्धत ही flexible असल्याने बऱ्याच नोकरदार पालकांसाठी आता ती सोयीची ठरत आहे. Meetings घेणं सुद्धा खूप सोयीचं झालं आहे. शिक्षक देखील उत्साहाने नवीन platform वर काम करत आहेत. आमच्या Software बरोबर LMS (Learning Management System) असल्याने सगळ्या नोटस्, गृहपाठ एका ठिकाणी देता येतात. ही पद्धत इतकी चांगली आहे की यापुढेही आम्ही शिक्षकांकडून blended पद्धतीचे Lesson Plan सोबतच videos सुद्धा घेणार आहोत.

पण आता सगळ्यांनाच थोडा fatigue जाणवायला लागला आहे. विद्यार्थी, शिक्षक सगळेच शाळा कधी सुरू होईल याची वाट बघत आहेत. Blended Curriculum राबवला, तरी प्रत्यक्ष संवाद, भेट, खेळ social interaction या गोष्टी बदलत नाहीत. लहान वयाच्या मुलांसाठी विशेषतः इतका मोठा काळ प्रत्यक्ष न भेटता राहणं हे खूप अवघड आणि कंटाळवाणं आहे. हे संकट लवकरात लवकर टळून पुन्हा पूर्वीसारखं सुरक्षित वातावरण आपल्याला परत मिळावं हीच इच्छा आहे.

## नवीन पर्व के लिये

आम्ही आत्तापर्यंत सांगत आल्याप्रमाणे, आमच्या शाळेवर प्रबोधिनीचा पगडा आहे. Out of the Box thinking ही प्रबोधिनीने आम्हाला दिलेली दिशा आहे. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये ती छाप दिसते. आमच्या शाळेमध्ये आमचं शाळेपुरते radio channel आहे. यासाठी अश्विनीने गाणं लिहिलं आहे आणि शाळेतल्या कला शिक्षकांनी त्याला चाल लावली आहे. प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीत पुढाकार घेऊन उत्साहाने काम करणे हे आम्ही प्रबोधिनीत शिकलो. कुठल्याही परिस्थितीला न भिता, त्यातून मार्ग काढणे हे आम्ही प्रबोधिनीतच शिकलो. एखादा विषय आपल्यासाठी नवीन असेल, तर बुजून न जाता त्याचा अभ्यास करणे या सवयीचा आम्हाला कायम फायदा झाला आहे. प्रबोधिनीने आम्हाला आत्मविश्वास दिला. ही शिदोरी घेऊन आम्ही वाटचाल करत आहोत. ती प्रेरणा घेऊन काम करत आहोत. गेल्या काही वर्षांत लताताई, विद्याताई आणि आण्णा आमची शाळा बघायला आले होते. त्यांना झालेला आनंद बघून आम्हाला खूप समाधान वाटले. विद्याताई म्हणाल्या, प्रबोधिनीची काही तत्त्वं आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम तुम्ही शाळेत केला आहे. आम्ही २०१९ च्या डिसेंबरमध्ये प्रशालेच्या सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमाला जेव्हा आमच्या शिक्षकांना भेटलो, तेव्हा त्या सगळ्यांना आमच्या शाळेत घेऊन यायचं ठरवलं होतं. पण कोरोनामुळे ते शक्य झालं नाही. आम्ही अजूनही आतुरतेने वाट पाहात आहोत, केव्हा आम्हाला आमच्या शिक्षकांना आमची शाळा दाखवता येईल.

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट –

अश्विनीताई : मला चित्रपट पाहायला खूप आवडतात. Eat, Pray, Love, 3 Idiots आणि मला इतर प्रादेशिक भाषांमधले चित्रपटपण आवडतात.

दीपालीताई : मलादेखील आवडतात चित्रपट पाहायला. 3 Idiots सिनेमा मला विशेष लक्षात राहिला.

२. आवडते पुस्तक –

अश्विनीताई : The Monk who sold his Ferrari.

दीपालीताई : मला सुधा मूर्ती यांनी लिहिलेल्या गोष्टी आणि पुस्तकं आवडतात.

३. आवडते शिक्षक –

अश्विनीताई : प्रबोधिनीत अशोकराव निरफराके, डॉ.कोलते (Ph.D. Guide).

दीपालीताई : प्रबोधिनीत गणित शिकवणारे देशमुख सर आणि इंजिनीअरिंग मधल्या राणे मॅडम.

४. पहिली प्रतिक्रिया –

अ. City Pride School – अश्विनीताई : Every Child is Different.
– दीपालीताई : दुसरं घर.

ब. प्रबोधिनी – अश्विनीताई : पहिलं घर.
– दीपालीताई : Proud to be a part of Prabodhini.

क. शिक्षण – अश्विनीताई : Continuous.
– दीपालीताई : जगण्याबद्दल positive दृष्टिकोन देणारं.

ड. शिक्षक – अश्विनीताई : Creative.
– दीपालीताई : झोकून देऊन शिकवणारा.

इ. National Education Policy 2020 –
– अश्विनीताई : Learn by Experience, Immersive way of learning.
– दीपालीताई : Developing the skills

५. आत्ताचं कार्यक्षेत्र सोडल्यास कुठल्या क्षेत्रात काम करायला आवडेल –
– अश्विनीताई: Law.
– दीपालीताई: Artist - painting or singing


**अश्विनी जांभेकर – कुलकर्णी**
**9822950400**
**ashwini2@yahoo.com**

**दीपाली जांभेकर – सवाई**
**9921000870**
**deepalisawai@gmail.com**



**मुलाखत – मुक्ता कापरे, अपूर्वा इनामदार, चिन्मयी खरे** **शब्दांकन – अपूर्वा इनामदार**

**संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org